महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९-ब/३०९०२
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २८/१२/२०१८

# परिपत्रक

**विषय :** दिनांक २० मार्च २०१८ व ०३ जुलै २०१८ रोजीची अनुपस्थिती विशेष नैमित्तिक रजा म्हणून मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक क्र.विनैसु-१५१८/ई-३०३२९३९/प्र.क्र.१३८/२९ दि.२६.१२.२०१८.
२) शासन परिपत्रक क्र.विनैसु-१५१८/अनौ.क्र.८/प्र.क्र.२०८/२९ दि.२६.१२.२०१८.

.....

दिनांक २० मार्च २०१८ व ०३ जुलै २०१८ रोजी मुंबई शहर व मुंबई उपनगरामध्ये उपनगरीय रेल्वेच्या पश्चिम, मध्य या रेल्वेमार्गावरील उपनगरीय वाहतूक सेवा विस्कळीत होती. त्यामुळे बहुसंख्य शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत. शासन परिपत्रक क्र. विनैसु-१५१८/ई-३०३२९३९/प्र.क्र.१३८/२९ दि. २६.१२.२०१८ व क्र. विनैसु-१५१८/ अनौ.क्र.८/प्र.क्र.२०८/२९ दि. २६.१२.२०१८ नुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक २० मार्च २०१८ व ०३ जुलै २०१८ रोजी विशेष नैमित्तिक रजा मंजूर केली आहे. त्याच धर्तीवर म.रा.वि.वि कं.म. मधील मुंबई शहर व मुंबई उपनगरातील कर्मचाऱ्यांना दि. २० मार्च २०१८ व ०३ जुलै २०१८ रोजी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०९.२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी, मुंबईमध्ये दिनांक २० मार्च २०१८ रोजी मध्य व ०३ जुलै २०१८ रोजी पश्चिम रेल्वेमार्गावरील उपनगरीय वाहतूक सेवा विस्कळीत झाल्यामुळे महावितरण कंपनीमधील जे अधिकारी/ कर्मचारी उपस्थित राहू शकले नाहीत अशा मध्य रेल्वेमार्गावर निवासस्थान असलेल्या कर्मचाऱ्यांना दि. २० मार्च २०१८ व पश्चिम रेल्वेमार्गावर निवासस्थान असलेल्या कर्मचाऱ्यांना दि. ०३ जुलै २०१८ रोजीची अनुपस्थिती विशेष नैमित्तिक रजा म्हणून मंजूर करण्यास मान्यता दिलेली आहे.

३. सदर परिपत्रक R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

अर्जुनवाडकर २८/१२/१८

(तुषार अर्जुनवाडकर)
महाव्यवस्थापक (मासं-नियोजन)